महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in



क्र.: सां.नि. व सु/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/३२५ दिनांक : ०२/११/२०२६.

वृत्तपत्रीय टिप्पणी

महानिर्मितीची सलग पाच महिने उच्चांकी वीज निर्मिती
जून २०२६ ते ऑक्टोबर २०२६ दरम्यान सलग ५ महिने उच्चांकी वीज निर्मिती

(मुंबई, दि. ०२/११/२०२६) : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती) औष्णिक वीज निर्मितीसह एकूण मासिक वीज निर्मितीमध्ये नवा इतिहास रचला आहे. राज्यात पडलेला कमी पाऊस आणि वाढते तापमान यामुळे विजेची वाढती मागणी लक्षात घेता महानिर्मितीने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक विक्रम शक्य झाला आहे. औष्णिक, जल, वायू आणि सौर वीज केंद्राच्या अधिकारी, अभियंता, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांच्या टीमवर्कचा हा परिपाक आहे. केलेले नियोजन, कार्यक्षमता वाढवण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि मार्गदर्शन यामुळेच हा विक्रम शक्य झाला आहे.

हा केवळ आकड्यांचा विक्रम नसून, महाराष्ट्राच्या विकासाला दिलेली ऊर्जेची शक्ती आहे.

या कालावधीतील मासिक वीज निर्मितीचा आढावा घेतला असता, जून २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ४,८५० दशलक्ष युनिट्स तर एकूण मासिक वीज निर्मिती ५,१५९ दशलक्ष युनिट्स झाली. जुलै २०२६ मध्ये औष्णिक ४,४३६ दशलक्ष युनिट्स आणि एकूण ४,८५८ दशलक्ष युनिट्स, तर ऑगस्ट २०२६ मध्ये औष्णिक ४,६५६ दशलक्ष युनिट्स आणि एकूण ५,२०९ दशलक्ष युनिट्स निर्मिती झाली. सप्टेंबर २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ४,६१५ दशलक्ष युनिट्स व एकूण मासिक निर्मिती ५,२७९ दशलक्ष युनिट्स नोंदवली गेली. त्यानंतर ऑक्टोबर २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ५,१५९ दशलक्ष युनिट्सवर पोहोचली, तर एकूण मासिक वीज निर्मिती ५,८१७ दशलक्ष युनिट्सचा टप्पा गाठून नवीन सर्वकालीन उच्चांक स्थापित झाला. यापूर्वी ऑक्टोबर महिन्यात सर्वोच्च वीज निर्मिती २०२३ मध्ये झाली होती, ज्याचा पूर्वीचा उच्चांक ५,३४२ दशलक्ष युनिट्स इतका होता.

सणासुदीचा काळ, भविष्यातील वाढती विजेची मागणी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी महानिर्मितीने सर्वंकष नियोजन केले असून, माननीय अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालक संचलन श्री.अभय हरणे यांच्या नेतृत्वामध्ये एका विशेष तज्ञ गटाची स्थापना करण्यात आली आहे. या उच्चांकी कामगिरीत महानिर्मितीच्या नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचाही अत्यंत महत्त्वाचा वाटा राहिला असून, नजीकच्या भविष्यात आणखी अनेक नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प वेगाने कार्यान्वित केले जात आहेत.

या उच्चांकी वीज उत्पादनासाठी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक माननीय श्री. राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) आणि महानिर्मितीचे सर्व संचालक श्री. अभय हरणे, श्री. मनेष वाघीरकर, श्री. राजेश पाटील, श्री. विजय राठोड यांनी महानिर्मितीच्या सर्व अधिकारी, अभियंता, कामगार आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती असताना महानिर्मिती उच्चांकी वीज निर्मिती करीत आहे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

******

दिनांक : ०२/११/२०२६.

प्रति,

मा. संपादक
दैनिक / वृत्तवाहिनी.

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in



क्र.: सां.नि. व सु/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/३२५ दिनांक : ०२/११/२०२६.

PRESS NOTE

Mahagenco Records Highest Ever Power Generation for 5 Consecutive Months
Record Power Generation Achieved Continuously from June 2026 to October 2026

(Mumbai, November 02, 2026): Maharashtra State Power Generation Company (Mahagenco) has created history by achieving its highest-ever thermal power generation alongside its overall monthly power production. Given the low rainfall across the state and rising temperatures leading to increased electricity demand, Mahagenco's meticulously planned efforts made this historical milestone possible. This achievement is the direct result of exemplary teamwork across thermal, hydro, gas, and solar power plants involving officers, engineers, technicians, and staff. Strategic planning, dedicated hard work to boost operational efficiency, and effective guidance made this record attainable.

This is not merely a record of numbers, but the power of energy driving Maharashtra's overall development.

A review of the monthly power generation during this period highlights steady peak performance. In June 2026, thermal power generation reached 4,850 million units, with total monthly generation at 5,159 million units. July 2026 recorded thermal generation at 4,436 million units and total generation at 4,858 million units, while August 2026 saw thermal generation rise to 4,656 million units with total production reaching 5,209 million units. September 2026 registered thermal generation of 4,615 million units and total monthly generation of 5,279 million units. In October 2026, thermal generation scaled to 5,159 million units, while overall monthly generation touched a landmark 5,817 million units, setting an all-time high record. Previously, the highest monthly power generation for October was recorded in 2023 at 5,342 million units.

To successfully meet the rising electricity demand during the festive season and into the future, Mahagenco has formulated comprehensive plans. Under the guidance of Chairman & Managing Director Shri. Radhakrishnan B. (IAS) and the leadership of Director (Operations) Shri. Abhay Harne, a special expert task force has been established. Renewable energy generation has also played a crucial role in this peak performance, and several new renewable energy projects are being rapidly commissioned.

On achieving this peak power generation, Chairman & Managing Director Shri. Radhakrishnan B. (IAS), along with Directors Shri. Abhay Harne, Shri. Manesh Waghikar, Shri. Rajesh Patil, and Shri. Vijay Rathod, extended their warm congratulations to all officers, engineers, workers, and employees of Mahagenco.

Against the backdrop of drought-like conditions in Maharashtra, Mahagenco achieving record electricity generation remains a matter of great pride.

****

Date : 02/11/2026.

To,

The Hon’ble Editor,
Daily Newspaper / News Channel

Respected Sir / Madam,

You are respectfully requested to kindly publish/broadcast the attached news item in all editions of your esteemed daily newspaper / news channel.

Thanking you,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : pro@mahagenco.in | apro@mahagenco.in



क्र.: सां.नि. व सु/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/३२५ दिनांक : ०२/११/२०२६.

<u>समाचार पत्र टिपणी / प्रेस विज्ञप्ति</u>

महानिर्मिति की लगातार पांच महीनों में उच्चतम बिजली उत्पादन का नया कीर्तिमान

जून 2026 से अक्टूबर 2026 तक लगातार 5 महीनों में दर्ज हुआ सर्वाधिक बिजली उत्पादन

(मुंबई, 02/11/2026): महाराष्ट्र राज्य बिजली उत्पादन कंपनी (महानिर्मिति) ने तापीय (थर्मल) बिजली उत्पादन के साथ-साथ कुल मासिक बिजली उत्पादन में एक नया इतिहास रचा है। राज्य में कम वर्षा और बढ़ते तापमान के कारण बिजली की बढ़ती मांग को देखते हुए महानिर्मिति द्वारा किए गए सुव्यवस्थित नियोजन के परिणामस्वरूप यह ऐतिहासिक रिकॉर्ड संभव हुआ है। यह उपलब्धि तापीय, जल, गैस और सौर बिजली केंद्रों के अधिकारियों, अभियंताओं, तकनीशियनों और कर्मचारियों के उत्कृष्ट टीमवर्क का परिणाम है। बेहतर नियोजन, कार्यक्षमता बढ़ाने के लिए की गई कड़ी मेहनत और सही मार्गदर्शन के चलते ही यह कीर्तिमान स्थापित हो सका है।

यह केवल आंकड़ों का रिकॉर्ड नहीं है, बल्कि महाराष्ट्र के विकास को दी गई ऊर्जा की शक्ति है।

इस अवधि के मासिक बिजली उत्पादन की समीक्षा करने पर निरंतर उच्च प्रदर्शन दिखाई देता है। जून 2026 में तापीय बिजली उत्पादन 4,850 मिलियन यूनिट्स तथा कुल मासिक बिजली उत्पादन 5,159 मिलियन यूनिट्स रहा। जुलाई 2026 में तापीय बिजली उत्पादन 4,436 मिलियन यूनिट्स तथा कुल उत्पादन 4,858 मिलियन यूनिट्स दर्ज हुआ, जबकि अगस्त 2026 में तापीय बिजली उत्पादन 4,656 मिलियन यूनिट्स तथा कुल उत्पादन 5,209 मिलियन यूनिट्स रहा। सितंबर 2026 में तापीय बिजली उत्पादन 4,615 मिलियन यूनिट्स और कुल मासिक उत्पादन 5,279 मिलियन यूनिट्स दर्ज किया गया। इसके बाद अक्टूबर 2026 में तापीय बिजली उत्पादन 5,159 मिलियन यूनिट्स पर पहुंचा, जबकि कुल मासिक बिजली उत्पादन 5,817 मिलियन यूनिट्स के ऐतिहासिक आंकड़े को छूकर ऑल-टाइम नया रिकॉर्ड बना। इससे पहले अक्टूबर महीने में सर्वोच्च बिजली उत्पादन 2023 में दर्ज किया गया था, जिसका पिछला रिकॉर्ड 5,342 मिलियन यूनिट्स का था।

त्योहारों के मौसम और भविष्य की बढ़ती बिजली मांग को सफलतापूर्वक पूरा करने के लिए महानिर्मिति ने व्यापक योजना बनाई है। माननीय अध्यक्ष एवं प्रबंध निदेशक श्री. राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) के मार्गदर्शन में तथा निदेशक (संचालन) श्री अभय हरणे के नेतृत्व में एक विशेष विशेषज्ञ समूह की स्थापना की गई है। इस सर्वोच्च प्रदर्शन में महानिर्मिति के नवीकरणीय (अक्षय) ऊर्जा उत्पादन का भी महत्वपूर्ण योगदान रहा है, और निकट भविष्य में कई अन्य नवीकरणीय ऊर्जा परियोजनाओं को तेजी से शुरू किया जा रहा है।

इस सर्वोच्च बिजली उत्पादन की उपलब्धि पर अध्यक्ष एवं प्रबंध निदेशक माननीय श्री. राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) तथा महानिर्मिति के सभी निदेशकों श्री. अभय हरणे, श्री. मनेश वाघीरकर, श्री. राजेश पाटिल और श्री. विजय राठौड़ ने महानिर्मिति के सभी अधिकारियों, अभियंताओं, श्रमिकों और कर्मचारियों को हार्दिक बधाई दी है।

महाराष्ट्र में सूखे जैसी स्थिति के बीच महानिर्मिति द्वारा उच्चतम बिजली का उत्पादन करना निश्चित रूप से अत्यंत गर्व का विषय है।

****

दिनांक : ०२/११/२०२६.

प्रति,

माननीय संपादक,
दैनिक समाचार पत्र / समाचार चैनल

आदरणीय महोदय / महोदया,

आपसे सविनय निवेदन है कि कृपया संलग्न समाचार को अपने लोकप्रिय समाचार पत्र के सभी संस्करणों / समाचार चैनल पर प्रकाशित एवं प्रसारित करने की कृपा करें।

सधन्यवाद,